पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा. ह प्रभाग मासीक सभा

सभावृत्तांत

कार्यपत्रिका क्रमांक – १२

दिनांक – ७/०२/२०१९

वेळ. दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समितीची मासीक सभा गुरुवार दिनांक ७/०२/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता ह क्षेत्रीय कार्यालयातील "पं.दीनदयाळ उपाध्याय सभागृहात" आयोजित करणेत आली होती सभेस खालील सन्मा.सदस्य / सदस्या उपस्थित होते.

| अ.क्र. | सन्मा.सदस्य नाव | |
|---|---|---|
| १ | मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत | सभापती |
| २ | मा.शाम गणपतराव लांडे | सदस्य |
| ३ | मा. बनसोडे राजू विश्वनाथ | सदस्य |
| ४ | मा. आशा धायगुडे – शेंडगे | सदस्या |
| ५ | मा. काटे स्वाती (माई) चंद्रकांत | सदस्या |
| ६ | मा. राजापुरे माधवी राजेंद्र | सदस्या |
| ७ | मा. चौगुले सीमा दत्तात्रय | सदस्या |
| ८ | मा. सोनवणे शारदा हिरेन | सदस्या |
| ९ | मा. उषा उर्फ माई मनोहर ढोरे | सदस्या |
| १० | मा. कुणाल दशरथ लांडगे | स्विकृत सदस्य |
| ११ | मा. संजय गुलाब कणसे | स्विकृत सदस्य |

याशिवाय श्रीम.आशा राऊत प्रशासन अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी, श्री.केशवकुमार फुटाणे (कार्य. अभियंता स्था), श्री.संजय खाबडे (कार्य.अभियंता वि), श्री. संजय भोसले (कार्य.अभियंता जलनि:सारण), श्री.विजयसिंह भोसले (उप.अभियंता स्थापत्य), श्री.नरोटे सुनिल (उप.अभियंता स्था.उ) श्री. शशिकांत दवंडे (उप अभियंता पापु), श्री.बाराथे प्रदीप ( लेखाधिकारी), श्री.ए.बी.कोंडे (उप अभियंता जलनि:सारण), श्री. पटेल जे.व्ही. (सहा.उद्यान अधिक्षक),श्री.संतोष लांडगे (उद्यान सहा. वृक्ष), श्री.आर.एस.माडे (का.अ.अतिक्रमण विभाग), श्री.जाधव अजय (मु.आ.नि.), श्रीम.साळवे जे.ए (क्रीडा पर्यवेक्षक), श्री.महाकाळ ए.के.(सहा.क्रीडा पर्यवेक्षक), श्री.कोटियाना डी.एम. (आ.नि पशुवैद्यकिय विभाग),श्री.महादेव बोत्रे (ए.एस. डब्ल्यू), श्रीम.अंकिता मोरे (क.अ.स्था.उ.), श्री. खरटमोल एस.व्ही (क.अ.पापु), श्री.जिंतीकर आर.एन. (क.अ.जनि), श्रीम.यादव .प्रिती (क.अ.जनि ), श्री. समीर दळवी (क.अ.वि), श्री.दांगडे सुनिल (क.अ.स्था), श्री.विजय कांबळे (क.अ.स्था). (क.अ.पापु), श्री.उध्दव डवरी (आ.नि.) श्री.सोमनाथ जाधव (लिपीक) हे अधिकारी सभेस उपस्थित होते

मा.सभापती – उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

अ) दिनांक ६/१२/२०१८ रोजी दु.१२.०० वा. व ३/१/२०१९ रोजी दु.११.४५ वा. झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्र.१० ) चा सभावृत्तांत कायम करणे

आ) दिनांक ३/१/२०१९ दु.१२.०० वा. व दिनांक १०/१/२०१९ दु.१२.०० वा. झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्र.११ ) चा सभावृत्तांत कायम करणे

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले -

| | |
|---|---|
| विषय क्र.२ | सांगवी (जुनी) प्रभाग क्र.३२ मधील म.न.पा.ची मराठी शाळेच्या इमारती मधील कमर्शियल गाळे बाबत – मा.उषा ऊर्फ माई ढोरे, मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव |
| विषय क्र.३ | कासारवाडी येथील टेनिस कोर्ट, स्केटिंग ट्रॅक व जे आर डी पुलाखाली जागा अभिनव गगन स्पोर्टसला मान्यता देणेबाबत - मा.आशा धायगुडे – शेंडगे, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव |
| विषय क्र.४ | दापोडी येथील हुतात्मा भगतसिंग विद्यालयास रंगरंगोटी करणेबाबत - मा.आशा धायगुडे – शेंडगे, मा.स्वाती (माई) काटे यांचा प्रस्ताव |
| विषय क्र.५ | प्रभाग क्र.३१ येथील सोसायटयांच्या सार्वजनिक परिसरामध्ये ब्लॉक बसविणेबाबत – मा.माधवी राजापुरे, मा.सीमा चौगुले यांचा प्रस्ताव |

ठराव क्र. - ४१ | विषय क्र - १
दि - ७/२/२०१९ | विभाग – नगरसचिव
सुचक – मा.शाम लांडे | अनुमोदक – मा. आशा धायगुडे – शेंडगे

संदर्भ - मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील जा.क्र. हक्षेका/१०/कावि/१६९/२०१८ दिनांक १४/११/२०१८ चा प्रस्ताव

विषय - मा. ह प्रभाग समिती नामनिर्देशित सदस्य यांना आयडेंटीटी कार्ड, व्हिजिटींग कार्ड, शिफारस पत्र, लेटरपॅड इत्यादी सुविधा महापालिकेच्या भांडार विभागामार्फत उपलब्ध करुन देणेकामीचा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले –

ठराव क्र - ४२

दि - ७ / २ /२०१९

विषय क्र - २

विभाग – स्थापत्य

सुचक – मा. उषा ऊर्फ माई ढोरे

अनुमोदक - मा.शारदा सोनवणे

संदर्भ - मा. उषा ऊर्फ माई ढोरे,मा.शारदा सोनवणे यांचा दि. ७ / २ / २०१९ चा प्रस्ताव

जुनी सांगवी प्रभाग क्र. ३२ मधील म.न.पा.ची मराठी शाळा आहे. त्या इमारतीमधील काही भागामध्ये कमर्शियल गाळे आहेत. त्या ठिकाणचे व्यापारी असलेल्या गाळयांचे कराराबाबत मुदत वाढ देऊ नये. त्याप्रमाणे ३० वर्षाचा करार करु नये.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र - ४३

दि - ७ / २ /२०१९

विषय क्र - ३

विभाग – स्थापत्य

सुचक – मा. आशा धायगुडे – शेंडगे

अनुमोदक -मा.स्वाती (माई) काटे

संदर्भ - मा. आशा धायगुडे – शेंडगे,मा.स्वाती (माई) काटे यांचा दि. ७ / २ / २०१९ चा प्रस्ताव

कासारवाडी येथील टेनिस कोर्ट, स्केटिंग ट्रॅक व जे आर डी पुलाखाली जागा अभिनव गगन स्पोर्टसला देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र - ४४

दि - ७ / २ /२०१९

विषय क्र - ४

विभाग – स्थापत्य

सुचक – मा. आशा धायगुडे – शेंडगे

अनुमोदक -मा.स्वाती (माई) काटे

संदर्भ - मा. आशा धायगुडे – शेंडगे,मा.स्वाती (माई) काटे यांचा दि. ७ / २ / २०१९ चा प्रस्ताव

दापोडी येथील हुतात्मा भगतसिंग शाळेचा रंग अत्यंत खराब झालेला आहे. तरी सदर विद्यालयास रंगरंगोटी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र - ४५ विषय क्र - ५

दि - ७/२/२०१९ विभाग – स्थापत्य

सुचक – मा. माधवी राजापुरे अनुमोदक -मा. सीमा चौगुले

संदर्भ - मा. माधवी राजापुरे,मा. सीमा चौगुले यांचा दि. ७/ २/२०१९ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३१ पिंपळे गुरव, नवी सांगवी भागातील अनेक सोसायटया जुन्या असुन यांच्या सभोवताली असणारा परिसरामध्ये घाणीचे साम्राज्य होत असते व यामुळे परिसरात दुर्गंधी पसरते. नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होतो तरी अशा अस्वच्छता असणा-या परिसरामध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले..

(मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत )
सभापती, ह प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जा.क्र. हक्षे/१०/कावि/ ३८/२०१९
दिनांक : २०/०२/२०१९

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
ह प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर